ठाणे, सोमवार दि. ३१ ऑगस्ट २०२६ वर्ष : १५, अंक : १२५, पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

मुख्य संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**सीजेपी राजकारणाकडे वळणार?**

दिल्लीच्या जंतर-मंतरवरील नीट पेपरफुटीविरोधी आंदोलनातून चर्चेत आलेले सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत ...पान 2 वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३१° से | २७° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| १,६३,९७० | २,६०,००० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



आघाडीतील ऐक्य या विषयावर बैठक सुरू झाली.परंतु मुद्दयांवरून गुद्दयांवर येईल असे वाटले नव्हते.

# ३२ व्या ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉनला उत्फूर्त प्रतिसाद

## ■ पुरुष गटात कोल्हापूरचा प्रविण कांबळे आणि
## ■ महिला गटात नाशिकची रविना गायकवाड ठरले विजेते









- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि लता शिंदे यांनी दाखवला मॅरेथॉनला झेंडा
- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही घेतला मॅरेथॉनमधील धावण्याचा आनंद
- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, आमदार रवींद्र फाटक यांच्या हस्ते झाले पारितोषिक वितरण
- ठाणे महापालिका आणि ठाणे जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन यांनी केले आयोजन

**एकूण ११ लाखांची बक्षिसे**

ठाणे वर्षा मॅरेथॉन स्पर्धा विविध 14 गटात झाली. विजेत्यांना 11 लाख रुपयांची रोख पारितोषिके देण्यात आली. २१ कि.मी स्पर्धेतील विजेत्यास एक लाखांचे रोख पारितोषिक, सन्माचिन्ह, मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

ठाणे - धाव प्रगतीची.. गतीशील ठाण्याची' या घोषवाक्यासह आयोजित करण्यात आलेल्या 32 व्या ठाणे महानगरपालिका व ठाणे जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन आयोजित ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन स्पर्धेत पुरुष गटात कोल्हापूरचा प्रविण कांबळे याने अव्वल स्थान पटकावले. त्याने 01 तास 07 मिनिटे आणि 21 सेकंद वेळेसह 21 किमीचे अंतर पार केले. तर, महिला गटात नाशिकची रविना गायकवाड यांनी 01 तास 26 मिनिटे आणि 04 सेकंद वेळ घेत शर्यत पूर्ण केली. या स्पर्धेत सुमारे 30 हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या पत्नी लता शिंदे यांनी मॅरेथॉनला झेंडा दाखवला. तर, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, माजी आमदार रवींद्र फाटक यांच्या हस्ते विजेत्या धावपटूंना गौरविण्यात आले.

सहा वर्षानंतर ठाणे महानगरपालिकेत महापौर, पदाधिकारी व नगरसेवक विराजमान झाल्यानंतरची ही 32 ची ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या अध्यक्षतेखाली मोठया उत्साहात पार पडली. यावेळी सहभागी धावपटूंचा उत्साह पाहून मॅरेथॉनला झेंडा दाखवल्यानंतर स्वत: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही मॅरेथॉनमध्ये धावण्याचा आनंद घेतला. त्यांनी धावपटूंसमवेत काही अंतर धावून त्यांचा उत्साह वाढवला.

ठाणे महानगरपालिका आणि ठाणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या 32 व्या वर्षा मॅरेथॉनचे रविवार सकाळी आयोजन करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुरुष गटाच्या तर लता शिंदे यांनी महिला गटाच्या स्पर्धेला झेंडा दाखवला. त्यानंतर, टप्प्याटप्याने एकूण 14 गटातील स्पर्धांचा शुभारंभ महापालिका मुख्यालयासमोरील चौकातून करण्यात आला. (पान २ वर)

## थोडक्यात घडामोडी

### चिमुकल्या गोविंदाने सातव्या थरावर चढून सलामी दिली इतक्यात सेफ्टी बेल्ट तुटला अन् थेट खाली... बदलापूरमध्ये अनर्थ टळला

बदलापूरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'माखन चोर दहीकाला उत्सवा'दरम्यान थरारक प्रसंग घडला. शिवसेना युवा सेना शहर प्रमुख, मितेश धुळे यांच्या आयोजनातून या दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माखन चोरहंडी फोडण्यासाठी बदलापूरच्या प्रज्वल प्रतिष्ठानच्या माध्यमातून गोविंदांनी सात थरांची सलामी दिली. सातव्या थराला सलामी दिल्यानंतर अचानक सेफ्टी बेल्ट तुटला आणि सातव्या थरावर असलेला चिमुकला थेट खाली कोसळला. हे दृश्य पाहून उपस्थितांच्या (पान २ वर)

### धक्कादायक! पोहण्यासाठी गेलेल्या तरुणांवर काळाचा घाला, कळवा खाडीत बुडून तीन जणांचा मृत्यू

ठाणे - ठाणे जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. कळवा खाडी, रेतीबंदर गणेश घाट याठिकाणी दुपारी पोहण्यासाठी गेलेल्या तीन तरुणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मृत्यू झालेले तीनही तरुण हे मुब्र्यातील असल्याची माहिती मिळत आहे. मुब्र्यातील ठाकूर पाडा इथं हे तरुण राहत होते. दरम्यान, या घटनेमुळं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले होते.

तिन्ही मृतदेह शिवविच्छेदनासाठी कळवा छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, आलम सय्यद (वय 42 वर्ष) रिझवान सय्यद (वय 42 ) आणि साहिल पोलंदाज (वय 28) (पान २ वर)

# मुंबई उच्च न्यायालयाची लिपिक भरती परीक्षा अखेर केली रद्द



**मुंबई: मुंबई उच्च न्यायालयाच्या लिपिक पदासाठी १६ ऑगस्ट रोजी घेण्यात आलेली ऑनलाईन टायपिंग परीक्षा अखेर उच्च न्यायालय प्रशासनाने अधिकृतपणे रद्द केली. परीक्षेदरम्यान राज्यभरातील अनेक केंद्रांवर मोठ्या प्रमाणात तांत्रिक बिघाड झाल्याने उमेदवारांनी तीव्र संताप व्यक्त केला होता. विद्यार्थ्यांचा वाढता रोष आणि विविध राजकीय नेत्यांच्या मागण्यांनंतर उच्च न्यायालय प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.**

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), कल्याण (ठाणे) यांसह महाराष्ट्रातील विविध परीक्षा केंद्रांवर उमेदवारांना गंभीर समस्यांना सामोरे जावे लागले. अनेक केंद्रांवर संगणकाचे कीबोर्ड आणि माऊस व्यवस्थित चालत नव्हते. तसेच, सर्व्हर डाऊन होणे आणि परीक्षा सुरू असतानाच अचानक उमेदवारांचे (पान २ वर)

### नवीन तारीख लवकरच कोर्टाच्या संकेतस्थळावर

उमेदवारांच्या तक्रारींची दखल घेत मुंबई उच्च न्यायालय प्रशासनाने ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. या परीक्षेची नवीन तारीख आणि पुनर्रचना लवकरच उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केली जाईल. उमेदवारांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर आणि ईमेलवर देखील याबाबतची माहिती दिली जाईल, असे न्यायालयाने जारी केलेल्या नोटीसमध्ये नमूद आहे.

### भरती प्रक्रियेवर परिणाम

मुंबई उच्च न्यायालयातील लिपिक पदाची भरती राज्यातील अनेक तरुणांसाठी महत्त्वाची संधी मानली जाते. टायपिंग परीक्षा ही निवड प्रक्रियेतील निर्णायक टप्पा असल्याने तिचे निकाल आणि पुढील प्रक्रिया रखडण्याची शक्यता आहे. परीक्षा रद्द झाल्याने उमेदवारांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणार असून, नव्या वेळापत्रकानुसार तयारीसाठी अतिरिक्त कालावधी मिळणार आहे.

■ **विद्यार्थ्यांची आंदोलने आणि राजकीय पाठिंबा**

# आजपासून समृद्धी महामार्गावर ८ दिवसांचा ब्लॉक

मुंबई नागपूर समृद्धी महामार्गावरून प्रवास करणाऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. महामार्गावरील तांत्रिक आणि दुरुस्तीच्या कामांसाठी ३१ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीत टप्प्याटप्प्याने विशेष 'वाहतूक ब्लॉक' घेतला जात आहे. ८ दिवसांच्या कालावधीत विशिष्ट तासांसाठी महामार्गावरील ठराविक टप्प्यांवर वाहतूक रोखली जाणार आहे. काही मार्गांवरील गाड्यांची वाहतूक वळवण्यात आली आहे. . (पान २ वर)

### ब्लॉकचा कालावधी:

- ३१ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर २०२६ दुपारी १२:०० ते दुपारी ०३:०० आणि दुपारी ०४:०० ते सायंकाळी ०६:०० (दररोज ठराविक टप्प्यांत २ ते ३ तासांचे ब्लॉक)
- नाशिक आणि ठाणे/इगतपुरी जोडणाऱ्या टप्प्यांवर तसेच शिर्डी ते भरणे/इगतपुरी यादरम्यानच्या उड्डाणपुलांच्या कामांच्या ठिकाणी वाहतूक थांबवली जाईल.
- काम सुरू असताना सुरक्षेचा उपाय म्हणून दोन्ही बाजूंची वाहतूक १५ ते ३० मिनिटांच्या अंतराने पूर्णपणे रोखली जाईल.
- ब्लॉकच्या कालावधीत काही ठिकाणी वाहतूक जुन्या मुंबई-नाशिक महामार्गावरून (NH-60 / NH-3) वळवण्यात येणार आहे.
- ज्या भागात काम सुरू आहे, तेथे वाहनांचा वेग ताशी ४० ते ५० किमी ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# भारतात एकही मुस्लीम नको म्हणणारा हिंदू कदाचित हिंदू नसेल



### सरसंघचालक मोहन भागवतांचं न्यूयॉर्कमधील कार्यक्रमात महत्त्वाचं वक्तव्य

अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे आयोजित 'एक जग, एक मानवता' परिषदेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी एक महत्वपूर्ण वक्तव्य करत जगाला एकटेच प्रभावी संदेश दिला. मोहन भागवत यांनी आपल्या भाषणात सांगितलं की, जर जर एखाद्या व्यक्तीचा असा विश्वास असेल की भारतात मुस्लिमांचे अस्तित्व नसावे, तर ती व्यक्ती स्वतःला हिंदू म्हणवू शकत नाही. जगभरातील धार्मिक नेत्यांमध्ये बोलताना, आरएसएस प्रमुखांनी स्पष्ट केले की, सर्व धर्म एकाच देवाकडे घेऊन जातात, ही श्रद्धा हिंदू असण्याची प्राथमिक अट आहे. त्यांनी यावर जोर दिला की, माणसांमध्ये कोणताही भेदभाव असू शकत नाही आणि प्रत्येक व्यक्तीचा आदर हाच मानवतेचा खरा पाया आहे. असेही ते म्हणाले.

**अमेरिका आणि भारताच्या डीएनए मध्येच एकता आणि विविधता** - 'भारत आणि अमेरिका या दोन्ही देशांच्या 'डीएनए'मध्ये (मूलभूत रचनेत) एकता आणि विविधता सामावलेली आहे,' असे प्रतिपादन करत मोहन भागवत यांनी दोन देशांमध्ये साम्य असल्याचेही अधोरेखित केले. अमेरिकेच्या संदर्भात 'बहुविधता' हा शब्द अनेकदा वापरला जातो, असे नमूद करून ते पुढे म्हणाले की, 'जेव्हा आपण भारताचा विचार करतो, तेव्हा 'विविधतेतील एकता' ही संकल्पना चर्चेत येते. ही एकता आणि ही विविधता, या दोन्ही गोष्टी त्यांच्या डीएनएचा भाग आहेत'. (पान २ वर)

### जर आपण समाजाला एकजूट केले नाही, तर त्यामुळे दिशाभूल होते

मोहन भागवत पुढे म्हणाले की, 'जर आपण समाजाला शिक्षित केले नाही, तर त्यामुळे समाजाची दिशाभूल होते. इतिहासात हे कसेतरी घडले तो क्षण मी निश्चितपणे सांगू शकत नाही. त्यानंतर, आपला समाज, आपला देश परकीय हल्ल्यांचे लक्ष्य बनला आणि अनेक गोष्टी गमावल्या गेल्या.

### 'ईश्वरापर्यंत पोहोचण्यासाठी धार्मिक विधींचे पालन करणे आवश्यक'

जगात अनेक धर्म आहेत. आज धर्मांची ओळख प्रामुख्याने त्यांच्या धार्मिक विधींवरून होते. धार्मिक शिस्त अंगीकारण्यासाठी आणि ईश्वरापर्यंत पोहोचण्याच्या त्या मार्गाचे अनुसरण करण्यासाठी धार्मिक विधींचे पालन करणे देखील आवश्यक आहे. असेही मोहन भागवत म्हणाले.

# स्मार्टफोनवरील जीएसटी कमी होणार? हँडसेट स्वस्त होण्याची शक्यता

**अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या निर्णयाकडे नजरा**



गेल्या काही महिन्यांमध्ये देशभरात ग्राहकांनी मोबाईल फोन खरेदी करण्याकडे मोठ्याप्रमाणावर पाठ फिरवल्याने स्मार्टफोनची बाजारपेठ थंडावली आहे. या बाजारपेठेत पुन्हा गती आणि चैतन्य आणण्यासाठी केंद्रातील मोदी सरकारकडून लवकरच महत्त्वाचा निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. येत्या 12 सप्टेंबरला GST Council ची 57 वी बैठक पार पडणार आहे. या बैठकीचे अध्यक्षपद केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन भूषवणार आहेत. यावेळी निर्मला सीतारामन यांच्याकडून स्मार्टफोनवर आकारण्यात येणाऱ्या 18 टक्के वस्तू व सेवा करात (GST) मोठी कपात केली जाण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास देशभरात स्मार्टफोनच्या किंमतीत मोठी घसरण होऊ शकते. त्यामुळे आता सर्वांना जीएसटी परिषदेच्या बैठकीत याबाबत काय निर्णय घेतला जाणार, याची उत्सुकता लागली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, सध्या स्मार्टफोनच्या खरेदीवर ग्राहकांकडून 18 टक्के जीएसटी आकारला जातो. यामध्ये मोठी कपात होऊ शकते. गेल्या (पान २ वर)

# ओरिजनल पैठणीवर येणार बारकोड अन् लोगो

सोलापूर : पैठणी म्हणजे महिलांच्या सौंदर्य खुलवणारं वस्त्रभूषण आहे, खेळ पैठणीच्या माध्यममातूनही पैठणी हा वस्त्रअलंकार घराघरात पोहोचला आहे. तसेच, सणासाठी, लग्नसमारंभासाठीही पैठणीची वेगळीच क्रेझ महिला वर्गात पाहायला मिळते. मात्र, ओरिजनल पैठणी म्हणत, सेमी पैठणी आणि डुप्लीकेट पैठणी देखील बाजारात विकली जाते. मात्र, आता याच सेमी पैठणी आणि ओरिजनल पैठणीतील फरक स्पष्ट होणार आहे. राज्याच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाने त्यासाठी नवी शक्कल लढवली असून ग्राहकांना दोन्हीतील फरक समजून पैठणी खरेदीपासून त्यांची होणारी फसवणूक टळणार आहे. राज्याचे स्त्रोद्योग मंत्री संजय



सावकारे यांनी पंढरपुरातून याबाबत माहिती दिली.

ग्राहकांना खरी पैठणी ओळखता यावी यासाठी आता पैठणीवर एक बारकोड आणि लोगो बनवण्याचा प्रयत्न वस्त्रोद्योग मंत्रालयाकडून सुरू आहे. त्यामुळे, पैठणी खरेदी करणाऱ्या ग्राहकांची फसवणूक

### ■ ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी आयडिया
### ■ संजय सावकारेंनी दिली माहिती

होणार नाही, अशी माहिती राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी दिली. आज पंढरपूर येथे विठ्ठल दर्शनासाठी आले असता सावकारे यांनी माध्यमांच्या प्रश्नांना उत्तरे देत याबाबत सांगितले. संजय सावकारे यांनी विठ्ठल मंदिरात येऊन दर्शन घेतले. यावेळी पंढरपूर मंगळवेढ्याचे आमदार समाधान आवताडे आणि पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. खऱ्या पैठणीची ओळख होण्यासाठी बारकोडच्या माध्यमातून कोणता धागा वापरलाय, कोणत्या गावात कोणत्या कारागिरांनी ही पैठणी तयार केली याची संपूर्ण माहिती ग्राहकांना उपलब्ध होणार आहे. त्यामुळे बनावट पैठणी ओळखता येणार असल्याचे सावकारे यांनी सांगितले. पैठणी महाराष्ट्राच्या संस्कृतीचा भाग आहे. त्यामुळे पैठणीला मागणी खूप आहे, तो एक कलेचा भाग आहे, एक पैठणी तयार करायला 20 ते 30 दिवस एवढा कालावधी कारागिरांना लागतो. पैठणीचे उत्पादन वाढवण्यासाठी कामगारांची संख्या वाढवण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी सुद्धा विभागाकडून प्रयत्न सुरू आहेत. पैठणी विक्रीसाठी वस्त्रोद्योग . (पान २ वर)



दैनिक महाराष्ट्र सम्राट — सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
ठाणे, सोमवार
दि. ३१ ऑगस्ट २०२६



# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## सीजेपी राजकारणाकडे वळणार ?

दिल्लीच्या जंतर-मंतरवरील नीट पेपरफुटीविरोधी आंदोलनातून चर्चेत आलेले सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दीपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षांबाबत केलेले वक्तव्य सध्या चर्चेचा विषय ठरले आहे. दीपके, सौरव दास आणि आशुतोष रंका यांच्यामध्ये राजकीय महत्त्वाकांक्षा आहेत, असे वांगचुक यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. मात्र, त्याच वेळी त्यांनी या महत्त्वाकांक्षांना दोष मानलेले नाही. उलट, राजकारणात जाण्याची इच्छा असणे स्वाभाविक असल्याचे सांगत त्यांनी आंदोलनाची अराजकीयता आणि पवित्रता जपण्यावर अधिक भर दिला आहे. या वक्तव्याकडे केवळ तीन व्यक्तींच्या राजकीय भवितव्याच्या संदर्भात पाहणे योग्य ठरणार नाही. त्यामागे आंदोलन आणि राजकारण यांच्यातील नाजूक नाते, जनतेचा विश्वास आणि सामाजिक चळवळींचे भवितव्य यांचा व्यापक प्रश्न दडलेला आहे.

लोकशाही व्यवस्थेत राजकीय महत्त्वाकांक्षा असणे हा गुन्हा नाही. उलट, समाजातील प्रश्नांवर काम करणाऱ्या व्यक्तीने पुढे जाऊन धोरणनिर्मितीत सहभागी व्हावे, सत्ता व्यवस्थेवर प्रभाव टाकावा आणि आपल्या विचारांना संस्थात्मक रूप द्यावे, अशी इच्छा असणे स्वाभाविक आहे. सामाजिक कार्यकर्ता, आंदोलक आणि राजकीय नेता यांच्यात स्पष्ट सीमारेषा असली तरी या तीनही भूमिका एखाद्या व्यक्तीच्या सार्वजनिक जीवनात वेगवेगळ्या टप्प्यांवर येऊ शकतात. त्यामुळे दीपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांना राजकीय महत्त्वाकांक्षा आहेत, या वांगचुक यांच्या वक्तव्याकडे संशयाच्या नजरेने पाहण्याची गरज नाही. मात्र, प्रश्न महत्त्वाकांक्षेचा नसून त्या महत्त्वाकांक्षेचा आंदोलनाशी असलेला संबंध किती पारदर्शक आहे, हा आहे. जंतर-मंतरवरील नीट पेपरफुटीविरोधी आंदोलनाने देशातील विद्यार्थ्यांच्या असंतोषाला व्यासपीठ दिले. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या लाखो तरुणांसाठी परीक्षा म्हणजे केवळ प्रश्नपत्रिका आणि निकाल नव्हे; त्यांच्या अनेक वर्षांच्या मेहनतीचे, कुटुंबाच्या आर्थिक त्यागाचे आणि भविष्यातील स्वप्नांचे ते प्रतीक असते. अशा वेळी पेपरफुटी किंवा परीक्षा व्यवस्थेतील गैरप्रकारांविरोधात उभे राहणाऱ्या आंदोलनाला व्यापक जनसमर्थन मिळणे साहजिक आहे. या आंदोलनात सोनम वांगचुक यांनी २६ दिवस उपोषण केले, ही बाब त्याच्या गांभीर्याची साक्ष देते.

परंतु अशा आंदोलनाला राजकीय पक्षाचे स्वरूप आले, तर परिस्थिती बदलते. आंदोलनातील प्रत्येक मागणी, प्रत्येक घोषणा आणि प्रत्येक निर्णयाकडे राजकीय हेतूने पाहिले जाऊ लागते. आंदोलनकर्त्यांची भूमिका योग्य असली तरी विरोधक त्याला राजकीय रंग देऊ शकतात. परिणामी, ज्या प्रश्नासाठी जनता रस्त्यावर उतरली आहे, तो प्रश्न बाजूला पडून आंदोलन करणाऱ्यांच्या राजकीय भूमिकेची चर्चा सुरू होते. वांगचुक यांनी नेमका हाच धोका ओळखला आहे. भारतीय राजकारणाच्या इतिहासात आंदोलनातून राजकारणात आलेल्या नेतृत्वाची उदाहरणे कमी नाहीत. अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनातून अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी राजकीय पक्षाची स्थापना केली. पुढे आम आदमी पक्षाने दिल्लीच्या राजकारणात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आणि इतर राज्यांतही विस्तार करण्याचा प्रयत्न केला. या प्रवासाने एक महत्त्वाचा धडा दिला, चळवळीतून राजकारणात जाणे शक्य आहे; परंतु चळवळ आणि पक्ष यांची भूमिका एकच नसते.

अण्णा आंदोलनाच्या काळातही आंदोलनाच्या व्यासपीठाचे पुढे काय करायचे, या प्रश्नावर मतभेद निर्माण झाले होते. काहींना व्यवस्था बदलण्यासाठी थेट राजकारणात उतरावे असे वाटत होते, तर काहींना आंदोलन स्वतंत्र सामाजिक दबावगट म्हणूनच राहावे असे वाटत होते. अखेरीस दोन वेगळे मार्ग निर्माण झाले. त्यामुळे आज दीपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांबाबत वांगचुक यांनी केलेले वक्तव्य त्या व्यापक राजकीय वास्तवाचीच आठवण करून देते. खरे तर प्रत्येक सामाजिक आंदोलनासमोर हा प्रश्न उभा राहतो. आंदोलनाला जनसमर्थन मिळते, नेतृत्व लोकप्रिय होते, माध्यमांचे लक्ष वेधले जाते आणि सत्ताधाऱ्यांवर दबाव निर्माण होतो. अशा परिस्थितीत आंदोलनातील नेतृत्वाला राजकीय पर्याय उपलब्ध होणे अपरिहार्य आहे. प्रश्न असा आहे की, त्या टप्प्यावर आंदोलनाची विश्वासार्हता कशी टिकवायची ? वांगचुक यांचे म्हणणे येथे महत्त्वाचे ठरते. त्यांनी दीपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांना राजकीय महत्त्वाकांक्षा असल्याबद्दल दोष दिलेला नाही. उलट ते अभ्यासू आणि चांगली माणसे असल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र, आंदोलन सुरू असताना त्याला राजकीय स्वरूप देऊ नका, असा सल्ला त्यांनी दिला होता. हा सल्ला त्यांनी अनुभवातून दिलेला आहे.

लोकशाहीत दबावगटांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. सरकार कोणत्याही पक्षाचे असो, जनतेच्या प्रश्नांसाठी संघटित आवाज उठवणारे स्वतंत्र व्यासपीठ असणे आवश्यक आहे. शेतकरी संघटना, विद्यार्थी संघटना, कामगार संघटना, पर्यावरणवादी चळवळी आणि नागरिक मंच हे सत्तेवर प्रश्न उपस्थित करतात. त्यांची ताकद त्यांच्या पक्षीय ओळखीत नसून त्यांच्या स्वायत्ततेत असते. म्हणूनच वांगचुक यांनी आंदोलनाला तटस्थ राजकीय दबावगट म्हणून ठेवण्याची भूमिका मांडली, ती विचार करण्यासारखी आहे. मात्र, याचा दुसरा पैलूही तितकाच महत्त्वाचा आहे. राजकारणापासून पूर्णपणे अलिप्त राहून सामाजिक बदल घडवता येतो का ? हा प्रश्नही विचारावा लागेल. यामुळेच आंदोलन राजकीय असू नये, पण आंदोलनकर्त्याला राजकीय होण्याचा अधिकार असावा, अशी संतुलित भूमिका अधिक योग्य ठरते. व्यक्तीला राजकारणात जाण्याचे स्वातंत्र्य असावे; परंतु त्यासाठी आंदोलनाच्या व्यासपीठाचा पक्षीय वापर होऊ नये.

आजच्या काळात सोशल मीडिया, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि यूट्यूबच्या माध्यमातून एखादी चळवळ अल्पावधीत देशव्यापी होऊ शकते. त्याच वेगाने त्या चळवळीला राजकीय लेबलही लागू शकते. त्यामुळे आंदोलनकर्त्यांनी पारदर्शकता, आर्थिक शुचिता, निर्णयप्रक्रियेतील स्पष्टता आणि राजकीय संबंधांबाबत प्रामाणिकपणा राखणे गरजेचे आहे. दीपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांना राजकीय महत्त्वाकांक्षा आहेत की नाहीत, यापेक्षा त्यांची पुढील भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे.त्याबाबत आजच अंतिम निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. वांगचुक यांच्या वक्तव्याचा अर्थ हाच आहे की, व्यक्तींच्या महत्त्वाकांक्षेपेक्षा चळवळीची विश्वासार्हता मोठी असते. राजकीय महत्त्वाकांक्षा असणे चुकीचे नाही; परंतु आंदोलनाचा विश्वासघात होऊ नये, ही अपेक्षा रास्त आहे. भारतीय लोकशाहीला अशा स्वतंत्र, जागरूक आणि निर्भीड चळवळींची गरज आहे. राजकीय महत्त्वाकांक्षा बाळगणे चुकीचे नाही. मात्र महत्त्वाकांक्षेसाठी लोकांचा विश्वास गमावणे हा दोष असतो. दीपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांना राजकारणात जायचे असेल तर त्यांनी जावे; पण त्यासाठी आंदोलनाची पवित्रता, पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांचा विश्वास अबाधित ठेवला पाहिजे. कारण चळवळी व्यक्तींपेक्षा मोठ्या असतात आणि जनतेचा विश्वास हा कोणत्याही राजकीय महत्त्वाकांक्षेपेक्षा मौल्यवान असतो.

# ३२ व्या ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉनला उत्फूर्त प्रतिसाद

**(पान १ वरून )** याप्रसंगी खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर, रवींद्र फाटक, उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, विरोधी पक्षनेते अशरफ शानू पठाण, महापालिका आयुक्त सौरभ राव, नौपाडा कोपरी प्रभाग समितीच्या सभापती मीनल संख्ये, उथळसर प्रभाग समिती सभापती नारायण पवार, वर्तकनगर प्रभाग समिती सभापती जयश्री डेव्हिड, लोकमान्य सावरकर प्रभाग समिती सभापती निर्मला कणसे, माजिवडा मानपाडा प्रभाग समिती सभापती सिध्दार्थ ओवळेकर, वागळे प्रभाग समिती सभापती एकता भोईर, कळवा प्रभाग समिती सभापती विजया लासे, दिवा प्रभाग समिती दिपक जाधव, शिवसेना गटनेते पवन कदम, भाजपा गटनेते मुकेश मोकाशी, नगरसेवक राजेश मोरे, मनोज शिंदे, विकास रेपाळे, दिपक वेतकर, संजय वाघुले, सुधीर कोकाटे, राजेंद्र फाटक, विक्रांत वायचळ, बाबाजी पाटील, शहाजी खुस्पे, सिध्दार्थ पांडे नगरसेविका मीनाक्षी शिंदे, नम्रता भोसले, सुखदा मोरे, प्रमिला केणी, ॲड अनिता गौरी, मृणाल पेंडसे, प्रतिभा मढवी, प्रियांका पाटील, अर्चना पाटील, दिपाली भगत, चंद्रकांता साळवी, सहर शेख, मनिषा कांबळे, स्नेहा पाटील, दर्शना म्हात्रे, नंदा पाटील, अपर्णा साळवी, माधुरी मेटांगे, विमल भोईर, वर्षा शेलार, संध्या मोरे, यज्ञा भोईर, माजी महापौर संजय मोरे, माजी उपमहापौर मनोज लासे, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, परिवहन व्यवस्थापन भालचंद्र बेहरे, उपायुक्त दिनेश तायडे, दिपक झिंजाड, मिताली संचेती, क्रीडा उपायुक्त मीनल पालांडे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसाद पाटील, छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयाच्या वैद्यकीय अधिष्ठाता डॉ. स्वप्नाली कदम, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, आदी उपस्थित होते.

■ **ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉनला ३२ वर्षाचा इतिहास -** या वर्षी पुन्हा ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन होत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. गेली 32 वर्षे या मॅरेथानला झाली आहे, या मॅरेथॉनसाठी पहिल्यापासून पुढाकार घेणारे स्व. माजी खासदार सतीश प्रधान यांनी प्रकर्षाने आठवण होत असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मॅरेथॉनला प्रारंभ करून देताना सांगितले. 32 वर्षाचा इतिहास या मॅरेथॉनला आहे. ठाणे बदलतंय आणि त्या बदलत्या ठाण्याबरोबर ठाण्यातील तरुणाईलाही उर्जा देण्याचे काम ही मॅरेथॉन करत आहे. म्हणूनच 'धाव ठाण्याची...गतीशील ठाण्याची'असे घोषवाक्य घेतले आहे. आंतरराष्ट्रीय खेळाडू नीलेश कुलकर्णी यांनी कॉफी टेबल बुकच्या माध्यमातून हा इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु 32 वर्षाचा हा इतिहास विस्तृत स्वरुपात जतन करण्याची सूचना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केली. ठाणे जिल्हयातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना ऑल्पिम्पिकमध्ये कसे सहभागी करता येईल या दृष्टीने प्रयत्न करा, त्यांना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नमूद केले.

■ **खेळाडूंचा सत्कार -** जागतिक स्तरावरील 38 व्या चिन्मय स्विम मॅरेथॉन 2026 झुरिच लेक, स्विर्त्झलंड येथील स्पर्धेत रिले पध्दतीने झुरिच लेक हे 26 किती अंतर 8 तास 7 मिनिटांत पूर्ण करणाऱ्या आयुषी कैलास आखाडे, समीप्ता गणेश वाव्हळ, सुयश प्रियंका हिंदळेकर, प्रशिक्षक कैलास आखाडे, जलतरण प्रकारात श्री शिवछत्रपती राज्य क्रिडा पुरस्कार प्राप्त करणाऱ्या उदय उमेश उतेकर, ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन स्पर्धेसाठी दरवर्षी योगदान देणारे रमेश खारकर, पंच म्हणून काम पाहणारे सुनील होनमाने, संतोष वायगणकर यांचा तसेच UP-SC-CDS परीक्षा उत्तीर्ण करून भारतीय नौदलात मध्ये वर्ग-१ अधिकारी म्हणून निवड झालेल्या ज्ञानेश आव्हाड यांचाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

■ **कॉर्पोरेट रन -** महापालिका अधिकारी कर्मचारी व लोकप्रतिनिधी यांच्यासाठी एक कि.मी ची 'कॉर्पोरेट रन' ठेवण्यात आली होती. या स्पर्धेत महापालिका अधिकारी, कर्मचारी, पत्रकार यांनी सहभाग घेतला. त्याचप्रमाणे, 60 वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांच्या स्पर्धेत महिला आणि पुरुष गटात ज्येष्ठ नागरिक उत्साहाने सहभागी झाले होते. त्याचबरोबर, दिव्यांगांच्या त्रिदल समुहानेही या मॅरेथॉनमध्ये विशेष सहभाग घेतला.

■ **सिनेकलाकारही धावले**
ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन स्पर्धेस सिनेकलावंत मंगेश देसाई, गश्मीर महाजनी किशारी आंबिये, ऐश्वर्या नारकर, अभिज्ञा भावे, हरिश थोरात, स्वराज नागांवकर, शिवानी सोनार, विजया बाबर, निखिल दामले, रोहित परशुराम, ट्विंकल यादव, दक्षता जुईल, अनुज साळुंखे, प्रतिक्षा शिवणकर, तनुष्का विशेल, चेतन गौरव, समीर परांजपे, अनघा ठाकूर उपस्थित होते. कलाकारांनी देखील स्पर्धकांचा उत्साह वाढवत एक कि.मी स्पर्धेत सहभाग घेतला.

■ **स्पर्धेचा निकाल -**
पुरुष खुला गट - अंतर २१ किमी
१. प्रविण कांबळे, कोल्हापूर
२. राजन विक्रमजीत यादव, पुणे
३. कालिदास हिरवे, नाशिक
४. अमित पाटील
५. तन्मय पवार
६. पराजीत गायकवाड
७. रुपनेर चैतन्य
८. राज तिवारी
९. अंकुश हक्के
१०. कमलाकर देशमुख

■ **महिला खुला गट - अंतर २१ किमी**
१. रविना गायकवाड, नाशिक
२. तेजस्विनी नरेंद्र लामकाने
३. साक्षी कसबे, पुणे
४. आचल कडुकर
५. यामिनी ठाकरे
६. साक्षी पवार
७. मनिषा पवार
८. अर्चना शेप
९. पायल विश्वकर्मा
१०. रुक्मिणी भोर

■ **पुरुष, १८ वर्षावरील, १० किमी**
१. अभिनंदन सुर्यवंशी
२. अतुल
३. सोहम शिंदे
४. करिहरपाल कार्तिक कुमार
५. दाजी हुबले
६. ईश्वर झिरवाळ
७. अजय पाल
८. पुंडलिक गवळी
९. विशाल बनसोडे
१०. रोशन रहाटे

■ **महिला, १६ वर्षावरील, १० किमी**
१. तृप्ती नागरकर
२. प्रतिक्षा राज
३. गौरी राऊत
४. प्रिया भोर
५. सुजाता मुंडेकर
६. श्वेता गावडे
७. विश्वेश्वरी न्हावी
८. दिशा वाघ
९. स्वरुपा पाटील
१०. डॉ. संजना पाटील

■ **मुले, १८ वर्षाखालील, १० किमी**
१. विवेककुमार शाह, जे.एस. डब्ल्यू स्पोटर्स, वासिंद
२. पवन गौड, इंदिरा गांधी स्कूल, ठाणे
३. प्रियांशु आत्माराम जैसवाल, जे.एस.डब्ल्यू स्पोटर्स, वासिंद
४. रोहित संगा पॉल, साकेत कॉलेज, कल्याण
५. आदित्य ध्रुवराज यादव, ठाकूर कॉलेज, कांदिवली
६. प्रिस रामसरन जैसवार, आर.जे. ठाकूर, ठाणे
७. अुनप संजय प्रजापती, सी.एच.कॉलेज, उल्हासनगर
८. आदित्य शामसुंदर प्रजापती, सतिश प्रधान ज्ञानसाधन कॉलेज, ठाणे
९. कृष्णा किशोर जाधव, अभिनव ज्ञानमंदिर कॉलेज, कर्जत
१०. अभिषेक अमरजित यादव, बी.एन. कॉलेज, भिवंडी

■ **मुले, १५ वर्षाखालील, ०५ किमी**
१. अयान वि. पिंजारी, रेम्बो स्पोटर्स ॲकॅडमी, अंबरनाथ
२. विनायक विजय यादव, कु.ब.न.प. शाळा क्र. 15 एरंजाड
३. युवराज तरणे, जे.एस.डब्ल्यु स्पोटर्स, वाशिंद
४. सुयश भीमा हेमाडे, कु.ब.न.प.शाळा क्र. 15 एरंजाड
५. अमन गोपाल गुप्ता, न.मु.म.पा.शाळा क्र. 104
६. शशांक न. उपाध्ये, रेम्बो स्पोटर्स अकॅडमी
७. कयान दिपक चौहान, राजे स्पोटर्स ॲकॅडमी, बदलापूर
८. प्रशांत विजय राणे, कु.ब.न.प. शाळा क्र. 15 एरंजाड
९. महाकेश पाल, रेम्बो स्पोटर्स अकॅडमी, अंबरनाथ
१०. आराध्य सुहास पाटील, सेव्हन स्टार स्पोटर्स अकादमी

■ **मुली, १५ वर्षाखालील, ०५ किमी**
1. करिश्मा अशोक राणे, कु.ब.न.प शाळा क्र. 15, बदलापूर
2. वंदना ठाकूर, जे.एस.डब्ल्यू, वाशिम
3 समीक्षा रोहिदास भोपी, कु.ब.न.प शाळा, बदलापूर
4. अक्षरा किरण पाटील, सेवा संयो
5. त्तैया ओझा, जे.एस. स्पोटर्स
6. जान्वी संतोष शेलार, कु.ब.न.प शाळा, बदलापूर
7. ईशा चंद्रकांत चव्हाण, कु.ब.न.प शाळा, बदलापूर
8. धनक्ती शशिकांत पष्टे, कु.ब.न.प शाळा, बदलापूर
9. भुमिका रमेश चव्हाण, कु.ब.न.प शाळा, बदलापूर
10. अल्पीता शंकर चव्हाण, कु.ब.न.प शाळा, बदलापूर

■ **मुले, १२ वर्षाखालील, ०३ किमी**
१. तेजप्रताप कुमार यादव, मध्य रेल्वे उच्चतर माध्य. विद्यालय कल्याण
२. रिदम निखिल साहिल, राजे स्पोटर्स
३. रोनक मंगेश आगळे, कु.ब.न.प शाळा 15, एरंजाड
४. तेजीतकुमार कमलेशकुमार यादव, सेंट्रल रेल्वे
५. रुद्र रणजीत सिंग, अंबरनाथ कला क्रीडा भारती अंबरनाथ
६. वेद विवेकप्रकाश गुप्ता, मध्य रेल्वे उच्चतर माध्यमिक विद्यालय कल्याण
७. क्षितीज बाबुरात कोरवी, रन होलीस
८. आयान नरेंद्र पांडे, रीमो स्पोम
९. रुद्र ओमप्रकाश यादव, राजे स्पोटर्स
१०. ऋतुराज वाल्मिक सोनावणे, डॉन बॉस्को स्कूल कल्याण

■ **मुली, १२ वर्षाखालील, ०३ किमी**
१. रिध्दी राजन देशमुख, राजे स्पोर्टस ॲकडमी बदलापूर
२. गार्गी मनोज भोईर, मोहिंदरसिंग काबलसिंग हायस्कुल
३. कितिका किशोर सावंत, राजे स्पोर्टस ॲकडमी बदलापूर
४. काव्या रोशन देशमुख, राजे स्पोर्टस ॲकडमी बदलापूर
५. सिध्दी राजन देशमुख , राजे स्पोर्टस ॲकडमी बदलापूर
६. आहाना सुरेश निरंकार, रेन्बो स्पोर्टस अकॅडमी
७. श्रावणी दिनेश शेलार, जे. एस.डब्ल्यू स्पोटर्स
८. अनन्या राजेशकुमार प्रसाद, रेम्बो स्पोटर्स अकॅडमी
९. रिया हेमंत गोसावी, अंबरनाथ कला क्रीडा भारती, अंबरनाथ
१०. अनन्या राजेशकुमार प्रसाद, अंबरनाथ कला क्रीडा भारती, अंबरनाथ

■ **पुरुष - ६० वर्षांवरील, ०१ किमी**
१. प्रभाकर यमनाजी डुंबरे
२. विष्णुदास रामभाऊ आवटे
३. सुधाकर परशुराम शिंदे
४. वाल्मिक सदोबा मांढरे
५. एकनाथ रघुनाथ पाटील

■ **महिला - ६० वर्षांवरील, ०१ किमी**
१. आशा किशोर पाटील
२. पुर्णिदेवी रमेश शर्मा
३. रेखा विलास ताम्हाणेकर
४. अंजली प्रदीप पांडे
५. उर्मिला दत्तात्रय तवटे

■ **ठाणे महानगरपालिका कर्मचारी वर्ग 3 कि.मी (पुरूष)**
1. राजेंद्र प्रल्हाद नांगरे (TDRF जवान)
2. गणेश भोये
3. तुषार दवणे
4. तानाजी भरसट
5. अंकुश पवार

■ **ठाणे महानगरपालिका कर्मचारी वर्ग 3 कि.मी (महिला)**
1. अंकिता मोरे 2. स्मिता काजळे 3. प्रिती राठोड 4. स्मिता महाजन 5. संध्या पांडे

■ **कॉर्पोरेट रन, अंतर ०१ किमी**
१. मारुती राजू लांडे २. कुणाल विक्रांत भोईटे
३. दिलीप शांताराम शिंदे ४. सौरभ राजीव डाके
५. निखिल मनोहर चव्हाण

## आजपासून समृद्धी महामार्गावर ८ दिवसांचा ब्लॉक

**(पान १ वरून )** गणेशोत्सवात गावी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढते, अशा वेळी हा ब्लॉक घेतला जात आहे. त्यामुळे प्रवाशांनी ऐनवेळी होणारी गैरसोय आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आपल्या प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन रस्ते विकास महामंडळाकडून करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने दिलेल्या माहितीनुसार, हा ब्लॉक टप्प्याटप्प्याने आणि विशिष्ट तासांसाठीच घेतला जाईल. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महामार्गावर वाहनांची गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेता, प्रवाशांनी वेळापत्रक पाहूनच प्रवासाचे नियोजन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## मुंबई उच्च न्यायालयाची लिपिक भरती परीक्षा अखेर केली रद्द

**(पान १ वरून )** अकाऊंट ऑटोमॅटिक लॉग-आउट होणे अशा तांत्रिक त्रुटी समोर आल्या होत्या. यामुळे अनेक उमेदवारांना पेपर पूर्ण करता आला नाही, अशी माहिती समोर आली आहे.

**विद्यार्थ्यांची आंदोलने आणि राजकीय पाठिंबा** - या तांत्रिक गोंधळानंतर परीक्षा केंद्राबाहेर उमेदवारांनी एकत्र येत जोरदार घोषणाबाजी आणि आंदोलने केली. 'सीजेपी' चे संस्थापक अभिजित दिपके आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते जयंत पाटील, रोहित पवार यांच्यासह अनेक सामाजिक व राजकीय नेत्यांनी या मुद्द्यावर आवाज उठवला होता. सदोष संगणक प्रणालीमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आल्याचा आरोप करत ही परीक्षा पुन्हा घेण्यात यावी, अशी आग्रही मागणी त्यांनी केली होती. यासंदर्भात रोहित पवार यांनी महाअधिवक्ता मिलिंद साठे आणि उच्च न्यायालयाच्या महानिबंधकांची भेट घेऊन ही परीक्षा रद्द करण्याची मागणी केली होती.

## स्मार्टफोनवरील जीएसटी कमी होणार? हँडसेट स्वस्त होण्याची शक्यता

**(पान १ वरून )** वर्षभरात स्मार्टफोनमध्ये वापरण्यात येणाऱ्या मेमरी चिपच्या दरात जवळपास 400 टक्क्यांची वाढ झाली आहे. परिणामी स्मार्टफोनच्या किंमतीही 20 टक्क्यांनी वाढल्या आहेत. याचा फटका बाजारपेठेला बसला होता. किंमत वाढल्यामुळे स्मार्टफोन खरेदी करणाऱ्या ग्राहकांच्या संख्येत मोठी घट झाली होती. त्यामुळे स्मार्टफोनचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांनी स्मार्टफोनवरील जीएसटी 18 टक्क्यांवरुन 5 टक्के इतका करावा, अशी मागणी केली होती. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ही मागणी मान्य केल्यास आगामी काळात स्मार्टफोनच्या किंमतीत लक्षणीय घट होण्याची शक्यता आहे. हा निर्णय मरगळ आलेल्या बाजारपेठेत नवचैतन्य निर्माण करु शकतो. आगामी काळात सणासुदीचे दिवस आहेत. या काळात भारतीय ग्राहक मोठ्याप्रमाणावर स्मार्टफोन आणि तत्सम इलेक्ट्रॉनिक वस्तूंची खरेदी करतात. त्यामुळे 12 सप्टेंबरच्या बैठकीत या अनुषंगाने महत्त्वाचा निर्णय घेतला जाणार का, हे पाहावे लागेल.

यापूर्वी सप्टेंबर 2025 मध्ये जीएसटी कौन्सिलची 56वी बैठक झाली होती. त्यावेळी काही प्रमुख घटकांवरील जीएसटी दरामध्ये कपात करण्यात आली होती. तसेच टॅक्स स्लॅबमध्येही बदल करण्यात आला होता. जीएसटीचे 4 स्लॅब कमी करून 2 मुख्य स्लॅब नेमण्यात आले होते. तसेच जीवन विमा आणि आरोग्य विम्यावरील जीएसटी माफ करण्यात आला होता.

## ओरिजनल पैठणीवर येणार बारकोड अन् लोगो

**(पान १ वरून )** विभागाच्या माध्यमातून आम्ही प्रदर्शन भरवत असतो, त्यामधून सुद्धा पैठणी खरेदीसाठी चांगली मागणी मिळत असल्याचे सावकारे यांनी सांगितले.

**मराठा बांधवांच्या मागण्या मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवणार -** दरम्यान, मराठा तरुणांनी विठ्ठल मंदिरापाशी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांना मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या लवकरात लवकर मान्य करण्याबाबत निवेदन दिले. यावेळी मराठा सेवा संघाचे अध्यक्ष किरण राज घाडगे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते. मनोज जरांगे यांचे सुरू असलेले उपोषण बाबत मराठा तरुणांनी दिलेले निवेदन मुख्यमंत्र्यांकडे पाठविणार असून मुख्यमंत्री हे जरांगे पाटील यांच्या काही त्रुटी असतील तर त्या नक्की दूर करतील असे त्यांनी सांगितले. लक्ष्मण हाके यांच्या मोर्चा बाबत बोलताना, सरकारला सर्व घटकांना घेऊन पुढे जावे लागत असते. त्यामुळे राज्यातील सर्वच घटकांच्या मागण्या मुख्यमंत्री पूर्ण करतील असा विश्वास वस्त्रोद्योग मंत्र्यांनी व्यक्त केला.

## चिमुकल्या गोविंदाने सातव्या थरावर चढून सलामी दिली इतक्यात सेफ्टी बेल्ट तुटला

## अन् थेट खाली... बदलापूरमध्ये अनर्थ टळला

**(पान १ वरून )** काळजाचा ठोका चुकला. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे घटनास्थळी उपस्थित नागरिक आणि गोविंदांमध्ये काही काळ खळबळ उडाली. चिमुकला खाली कोसळताच त्याला तातडीने सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले. दहीहंडी उत्सवात उंच थर रचताना गोविंदांच्या सुरक्षेसाठी सेफ्टी बेल्टसह विविध सुरक्षा उपाययोजना केल्या जातात. मात्र, सातव्या थराला सलामी दिल्यानंतरच सेफ्टी बेल्ट तुटल्याने सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.या थरारक घटनेचा व्हिडिओ सध्या समोर आला असून, दहीहंडी उत्सवादरम्यान घडलेल्या या प्रकाराची जोरदार चर्चा सुरू आहे. याठिकाणी लावलेला सेफ्टी बेल्ट का तुटला, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. सध्या आयोजकांकडून हा प्रकार कसा घडला, याची चौकशी केली जात आहे.

यामुळे पुन्हा एकदा गोविंदा पथकातील तरुण आणि लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबईत मोठ्याप्रमाणावर दहीहंडी उत्सव साजरा होतो. यंदा 5 सप्टेंबरला दहीहंडी आहे. मुंबई आणि ठाण्यात विविध राजकारण्यांकडून लाखो रुपयांची बक्षिसं असलेले दहीहंडी उत्सव आयोजित केले जातात. मात्र, या दहीहंडी अत्यंत उंचावर असल्याने गोविंदा पथकांना नऊ ते दहा थर लावावे लागतात. या प्रयत्नात दरवर्षी दहीहंडी उत्सवात अनेक गोविंदा जखमी होतात. अलीकडच्या काळात सर्वात वरच्या थरावर चढणाऱ्या चिमुकल्या गोविंदांसाठी सेफ्टी बेल्ट हा अनिवार्य करण्यात आला आहे. मात्र, बदलापूरमध्ये सेफ्टी बेल्टच तुटल्याने गोविंदाच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## भारतात एकही मुस्लीम नको म्हणणारा हिंदू कदाचित हिंदू नसेल

**(पान १ वरून )** शनिवारी मॅडिसन स्क्वेअर गार्डन येथे आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. 'युनिव्हर्सल वननेस सेलिब्रेशन' (जागतिक एकात्मता उत्सव) असे नाव असलेल्या या कार्यक्रमाचे आयोजन 'अमेरिकन हिंदूज फॉर एंगेजमेंट अँड डायलॉग' या गटाने केले होते. एका अर्थपूर्ण आणि तत्त्वज्ञानात्मक भाषणात भागवत पुढे म्हणाले, 'राष्ट्र ही केवळ भौगोलिक अस्तित्वे नसतात. या विश्वाच्या रचनेत राष्ट्रांना एक विशिष्ट कर्तव्य पार पाडावे लागते. स्वामी विवेकानंद म्हणाले होते की, प्रत्येक राष्ट्राला एक नियती किंवा ध्येय पूर्ण करायचे असते. भारताच्या वाट्याला आलेली नियती काय आहे? तर, 'विविधतेतील एकता' हे तत्त्व स्वतः अनुभवणे आणि वेळोवेळी जगाला त्याची जाणीव करून देणे, हे भारताचे कार्य आहे. आपण एक आहोत आणि विविधतेमुळेच त्या एकत्वाला अधिक शोभा प्राप्त होते."

'धर्म वेगवेगळे असू शकतात, पण मानवता एक आहे'

आपल्या भाषणात मोहन भागवत पुढे म्हणाले की, 'मी अशा समाजासाठी काम करत आहे, जो पारंपरिकरित्या मानतो की धर्म वेगवेगळे असू शकतात, पण मानवता एक आहे. सत्य एकच आहे. मानवता हे त्या सत्याचेच फळ आहे. म्हणूनच, मानवता एक आहे. सत्य एकच आहे. ते वेगवेगळ्या प्रकारे व्यक्त आणि स्पष्ट केले जाते. आपण मानव आपल्याच अनुभवांचे आणि मर्यादांचे कैदी आहोत'. असेही ते म्हणाले.

## धक्कादायक! पोहण्यासाठी गेलेल्या तरुणांवर काळाचा घाला, कळवा खाडीत बुडून तीन जणांचा मृत्यू

**(पान १ वरून )** अशी कळवा खाडीत बुडून मृत्यू झालेल्या तरुणांची नावे आहेत. ठाणे महापालिकेच्या TDRF जवानांकडून तिन्ही मृतदेह शोधून बाहेर काढण्यात यश आले आहे. तिन्ही मृतदेह शिवविच्छेदनासाठी कळवा छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, या घटनेमुळं मोठी खळबळ उडाली आहे.

**पोहण्यासाठी जाणं तरुणांच्या जीवावर बेतलं** - दरम्यान, हे तिन्ही तरुण नेमके कसे बुडाले याबाबतची माहिती अद्याप मिळालेली नाही. मात्र, कळवा खाडी, रेतीबंदर गणेश घाट परिसरात पोहण्यासाठी जाणं तरुणांच्या जीवावर बेतले आहे. एकाच वेळी तीन तरुणांचा बुडून मृत्यू झाल्यानं हळहळ व्यक्त केली जात आहे. हे तिनही तरुण मुब्र्यातील ठाकूर पाडा येथील रहिवासी असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन घटनास्तली दाखल झाले होते. तसेच ठाणे महापालिकेचे टीडीआरएफ जवान देखील घटनास्थळी दाखल झाले होते. माहिती मिळाल्यानंतर लगेच बचावकार्य देखील सुरु करण्यात आले होते. मात्र, तिनही तरुणांचा मृत्यू झाला आहे. जवानांनी तिनही मृतदेह शोधून बाहेर काढले आहेत. शिवविच्छेदन करण्यासाठी मृतदेह रुग्णालयात नेम्यात आले आहेत.

## भारतीय रेल्वे

■ पदाचे नाव & तपशील:
1 ज्युनियर इंजिनिअर 4098
2 डेपो मटेरियल सुपरिटेंडंट
3 केमिकल & मेटलर्जिकल असिस्टंट
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.1: इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics/ Civil/ Mechanical / Production / Automobile / Instrumentation and Control / Manufacturing / Mechatronics / Industrial / Machining / Tools and Machining / Tools and Die Making / Automobile / Information Technology / Communication Engineering / Computer Science and Engineering / Computer Science / Computer Engineering)
पद क्र.2: कोणत्याही विषयातील इंजिनिअरिंग डिप्लोमा.
पद क्र.3: 45% गुणांसह B.Sc (Physics/Chemistry)
■ वयाची अट: 01 जानेवारी 2027 रोजी 18 ते 33 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ₹500/- [SC/ST/ExSM/ट्रान्सजेंडर/EBC/महिला: ₹250/-]
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 13 सप्टेंबर 2026 (11:59 PM)
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल
■ अधिकृत संकेत स्थळ
https://www.rrbmumbai.gov.in/




## भारतीय स्टेट बँक

■ जाहिरात क्र.: CRPD/CR/2026-27/17
■ Total: 9124 जागा
■ पदाचे नाव & तपशील:
■ पद क्र. पदाचे नाव पद संख्या
1 ज्युनियर असोसिएट (लिपिक) (कस्टमर सपोर्ट & सेल्स) 9124
■ शैक्षणिक पात्रता: कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: 01 एप्रिल 2026 रोजी 20 ते 28 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: GEN/OBC/EWS: ₹750/- [SC/ST/PWD/ExSM: फी नाही]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 31 ऑगस्ट 2026
■ पूर्व परीक्षा: सप्टेंबर 2026
■ मुख्य परीक्षा: नोव्हेंबर 2026
■ अधिकृत वेबसाइट
https://sbi.bank.in/

## UPSC मार्फत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी

■ पदाचे नाव & तपशील:
1 सहाय्यक भविष्य निर्वाह निधी आयुक्त (EPFO) 80
■ शैक्षणिक पात्रता: कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: 11 सप्टेंबर 2026 रोजी 18 ते 35 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: ₹25/- [SC/ST/PH/महिला: फी नाही]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 11 सप्टेंबर 2026
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाइट
https://www.upsc.gov.in/#

## भारतीय रेल्वे

■ पदाचे नाव & तपशील:
1 ज्युनियर इंजिनिअर 3993+1
2 डेपो मटेरियल सुपरिटेंडंट
3 केमिकल & मेटलर्जिकल असिस्टंट New 35
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.1: इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics/ Civil/ Mechanical / Production / Automobile / Instrumentation and Control / Manufacturing / Mechatronics / Industrial / Machining / Tools and Machining / Tools and Die Making / Automobile / Information Technology / Communication Engineering / Computer Science and Engineering / Computer Science / Computer Engineering)
पद क्र.2: कोणत्याही विषयातील इंजिनिअरिंग डिप्लोमा.
पद क्र.3: B.Sc. (Physics & Chemistry)
■ वयाची अट: 01 जानेवारी 2027 रोजी 18 ते 33 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ₹500/- [SC/ST/ExSM/ट्रान्सजेंडर/EBC/महिला: ₹250/-]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 13 सप्टेंबर 2026 (11:59 PM)
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल
■ अधिकृत वेबसाइट
https://www.rrbmumbai.gov.in/

## पुणे आयकर विभाग

■ पदाचे नाव & तपशील:
1 स्टेनोग्राफर ग्रेड II 06
2 टॅक्स असिस्टंट (TA) 40
3 मल्टी टास्किंग स्टाफ (MTS) 39
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.1: (i) 12वी उत्तीर्ण (ii) संबंधित क्रीडा पात्रता.
पद क्र.2: (i) पदवीधर (ii) संबंधित क्रीडा पात्रता.
पद क्र.3: (i) 10वी उत्तीर्ण (ii) संबंधित क्रीडा पात्रता.
क्रीडा पात्रता: राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व करणारे खेळाडू/आंतरविद्यालयामध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणारे खेळाडू/ अखिल भारतीय शाळेने आयोजित केलेल्या राष्ट्रीय खेळ /खेळांमध्ये भाग घेणारे खेळाडू/राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित खेळाडू (सविस्तर माहितीकरिता कृपया जाहिरात पाहा)
■ वयाची अट: 01 जानेवारी 2026 रोजी [05 वर्षे सूट, SC/ST: 10 वर्षे सूट]
पद क्र.1: 18 ते 27 वर्षे
पद क्र.2: 18 ते 27 वर्षे
पद क्र.3: 18 ते 25 वर्षे
■ नोकरी ठिकाण: पुणे
■ Fee: ₹200/-
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 15 सप्टेंबर 2026
■ अधिकृत वेबसाइट
https://www.incometaxindia.gov.in/pune/news-updates

## इंडियन ओव्हरसीज बँक

■ पदाचे नाव & तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
1 जनरलिस्ट/स्पेशलिस्ट ऑफिसर 291
■ शैक्षणिक पात्रता: (i) MCA / M.Sc. (Computer Science/IT) / B.E. / B.Tech. (Computer Science / IT / Electronics & Communication / Electronics & Instrumentation / Cyber Security / Information Security) किंवा कोणत्याही शाखेतील पदवी + MBA (Finance) / PGDM (Finance) / PGDBF / MFM / MFC / CA / CMA, (ii) अनुभव: 02 ते 08 वर्षे पदानुसार
■ वयाची अट: 01 ऑगस्ट 2026 रोजी 32/33/35/38/45 वर्षांपर्यंत, पदानुसार [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ₹1000/- [SC/ST/PWD: ₹175/-]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 15 सप्टेंबर 2026
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल
■ अधिकृत वेबसाइट
https://www.iob.bank.in/en/




आपल्या दिवसाच्या सुरुवात सकाळी उठल्यावर एक कप चहा त्यात बिस्किट याशिवाय होत नाही. उपाशीपोटी चहा प्यायल्याने ॲसिडीटी होण्याची शक्यता असते असे तुम्हाला लहानपणापासून सांगितले जाते. म्हणूनच आपल्याला चहासोबत काही प्रमाणात बिस्किटे खाण्याची ही सवय लागली.
बरेच लोक चहा किंवा कॉफीसोबत अनेकदा बिस्किटे खातात, फक्त सकाळीच नाही तर दिवसभरात तुम्ही सकाळी किती बिस्किटे खातात? याशिवाय तुम्ही दररोज खात असलेल्या बिस्किटांमध्ये कोणते घटर असतात? याचा तुम्ही कधी विचार केलाय का?

तज्ज्ञांच्या मते, जास्त बिस्किट खाल्ल्याने चरबी वाढते. खरंतर बिस्किटे बनवण्यासाठी रिफाइंड मैदा आणि हायड्रोजन फॅट वापरतात. त्यामुळे वजन वाढते. त्यामुळेच चहासोबत बिस्किटेही असली पाहिजेत. पण याच बिस्किटांचे दुष्परिणाम जाणून घ्या...
कोणतेही अन्न खाल्ल्यानंतर केवळ शरीराचे वजनच नाही तर इन्सुलिनची पातळीही वाढते. खरंतर बिस्किटमध्ये इमल्सीफायर, प्रिझर्व्हेटिव्ह आणि कलरिंग सारखी रसायने मिसळली जातात जेणेकरून ते जास्त काळ टिकेल. यासोबतच त्यात गोड आणि साखरेचे प्रमाण अधिक आहे, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढते.

### सुरकुत्या पडणे

आजकाल खाण्यापिण्यामुळे चेहऱ्यावर पुरळ उठणे ही एक सामान्य गोष्ट आहे. पण याकडे दुर्लक्ष करू नकाय चहा-बिस्किट कॉम्बिनेशन हे खरतंही एक प्रमुख कारण आहे. याचे कारण म्हणजे बिस्किटांमध्ये आढळणाऱ्या शुद्ध साखरेमध्ये पौष्टिक घटक नसतात. याच कारणामुळे त्वचेवर लवकर सुरकुत्या पडतात. यासाठी वसायुक्त गोष्टींचा वापर करावा. असे केल्याने केवळ सुरकुत्यांची समस्याच नव्हे तर पचनक्रियाही सुधारते.

### वजन वाढणे

{बिस्किटमध्ये उच्च कॅलरी आणि हायड्रोजनेटेड फॅट मुबलक प्रमाणात असते. परिणामी लठ्ठपणा ही वाढला जातो. सामान्य बिस्किटांमध्ये किमान ४० कॅलरीज असतात.
तसेच, प्रत्येक बिस्किटात भाजलेल्या क्रिम्स किंवा नुकत्याच बेक्ड केलेल्या प्रति बिस्किटमध्ये १००-१५० कॅलरीज असतात.

### दातांवर वाईट परिणाम

चहा-बिस्किटाच्या मिश्रणाचा दातांवर चुकीचा प्रभाव टाकतात, खरंतर चहा आणि बिस्किटांमध्ये असलेले सुक्रोज दात किडण्यास कारणीभूत ठरते. याचे सेवन केल्याने दात लवकर पडणे, दात किडणे किंवा तोंडातील बॅक्टेरियासारखे काही आजार होतात. दातदुखी, दातांचा रंग खराब होणे, त्यावर डाग पडणे अशा समस्या उद्भवू शकतात.

संपादक : गणेश चंद्रकांत भोईटे

## 'देवघर ऑन रेंट' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

दिवसेंदिवस मराठी चित्रपट ग्लोबल होणे ही कोणत्याही मराठी माणसासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. जागतिक पातळीवर नावलौकीक मिळवणाऱ्या मराठी चित्रपटांच्या प्रवाहात सामील होण्यासाठी भारतातील इतर प्रादेशिक सिनेसृष्टीतील कलाकार-तंत्रज्ञही उत्सुक असल्याचे नेहमी पाहायला मिळते. अनोखे शीर्षक आणि विषयामुळे चर्चेत आलेल्या दिग्दर्शक स्वरूप सावंत दिग्दर्शित 'देवघर ऑन रेंट' या मराठी चित्रपटातही दाक्षिणात्य कलाकार-तंत्रज्ञांचा समावेश करण्यात आला आहे. विशेष म्हणजे हा चित्रपट २५ सप्टेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रासह बेळगांव, हैद्राबाद, इंदौर, बडोदा येथे प्रदर्शित होणार आहे.

आनंदी पिक्चर्स अमरावती प्रस्तुत आणि राधाकृष्ण प्रोडक्शन निर्मित या चित्रपटाचे निर्माते सचिन रोडे पाटील आणि पूनम चौधरी पाटील आहेत. सध्या जोरदार चर्चेत असलेल्या 'महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स' या मराठी चित्रपटाचे दिग्दर्शक स्वरूप सावंत यांनी 'देवघर ऑन रेंट'चे दिग्दर्शन केले आहे. या चित्रपटाची संकल्पना पूनम चौधरी पाटील यांची असून कथा-पटकथा व संवादलेखन संजय नवगिरे यांनी केले आहे. नुकतीच या चित्रपटाबाबतची महत्त्वाची माहिती रिव्हील करण्यात आली आहे. या चित्रपटात श्रवण राघवेंद्र आणि 'केजीएफ'फेम अभिनेता गरुडा राम यांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. 'देवघर ऑन रेंट' या शीर्षकानुसार या चित्रपटात आध्यात्माची




सांगड घातलेली कथा पाहायला मिळणार असली तरी त्याला दमदार ॲक्शनचीही जोड देण्यात आली आहे. ॲक्शनच्या बाबतीत भारतीय सिनेसृष्टीत दाक्षिणात्य चित्रपट उजवे मानले जातात. मागील काही वर्षांमध्ये हिंदी भाषिक प्रेक्षकांनीही दाक्षिणात्य शैलीतील ॲक्शनवर प्रेम केले आहे. आता ही ॲक्शन 'देवघर ऑन रेंट'च्या निमित्ताने मराठी चित्रपटातही पाहायला मिळणार आहे. 'पुष्पा'फेम ॲक्शन मास्टर कार्तिक डंगरी यांनी ॲक्शन मास्टर म्हणून काम पाहिले आहे. खुर्चीला खिळवून ठेवणारी ॲक्शनदृश्ये या चित्रपटाचे वैशिष्ट्य ठरणारी आहेत. यासाठी हिंदी आणि दाक्षिणात्य चित्रपटांच्या तोलामोलाच्या निर्मितीमूल्यांचा समावेश करण्यात आला आहे.

दमदार ॲक्शन ही या चित्रपटाच्या कथेची गरज होती. चित्रपटात जे सादर करायचे ते प्रेक्षकांचे परिपूर्ण मनोरंजन करणारे असावे या भावनेतून धडाकेबाज ॲक्शन्सचा समावेश करण्यात आला असल्याचे निर्माते सचिन रोडे पाटील म्हणाले. याबाबत दिग्दर्शक स्वरूप सावंत म्हणाले की, केवळ रसिकांचे लक्ष वेधण्यासाठी दाक्षिणात्य ॲक्शन मास्टर कार्तिक डंगरी यांची निवड करण्यात आलेली नाही. त्यांचे काम पाहून रसिकही खुश होतील. नाट्यमय घडामोडींचा समावेश असलेल्या पटकथेतील ॲक्शन रसिकांना खिळवून ठेवेल. गरुडा राम आणि श्रवण राघवेंद्र यांनी दक्षिणेकडे खूप काम केले असून, लोकप्रियही आहेत. या चित्रपटात दोन महत्त्वाच्या व्यक्तिरेखा साकारण्यासाठी त्यांच्यासारख्या मातब्बर कलाकारांची आवश्यकता होती. दोघांनीही आमचा विश्वास सार्थ ठरवला आहे. हा चित्रपट आध्यात्माची वर्तमानाशी सांगड घालणारा आहे. आजची गोष्ट सांगणाऱ्या या चित्रपटातील आध्यात्माचा मुद्दा अतिशय महत्त्वाचा असल्याचे दिग्दर्शक स्वरूप सावंत यांनी स्पष्ट केले. 'देवघर ऑन रेंट' या चित्रपटात निखिल चव्हाण, अंकित मोहन, भाऊ कदम, शशांक शेंडे, अश्विनी चवरे, वैभव चव्हाण, सुरेश विश्वकर्मा, अनिल नगरकर, सिद्धेश्वर झाडबुके आणि गौतमी पाटील आदी कलाकार आहेत. संगीतकार एस. सागर आणि कबीर शाक्य यांनी या चित्रपटातील अर्थपूर्ण गीतांना सुमधूर स्वरसाज चढवला असून, कोरीओग्राफी किशोर दळवी यांनी केली आहे. डिओपी चैतन्य साळुंखे यांनी सिनेमॅटोग्राफी केली असून, रोहित नागभीडे यांनी पार्श्वसंगीत केले आहे. कला दिग्दर्शनाचे काम दिलीप कंधारे यांनी पाहिले आहे. वेशभूषा अपेक्षा गांधी सोनी यांनी, तर रंगभूषा सुजीत सुरवसे यांनी केली आहे. या चित्रपटाचे कार्यकारी निर्माते अनुनेहा घोडके आणि निर्मिती व्यवस्थापक यश सणस आहेत. अक्षय लोणदे यांनी सिंक साऊंड, शर्मा यांच्या टिमने प्रकाश योजना आणि विजय म्हस्के यांनी प्रॉडक्शन हेड म्हणून काम पाहिले आहे.

## ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन; अनेक स्पर्धकांचा पुढील वर्षी बहिष्काराचा निर्णय

ठाणे : अत्यंत गाजावाजा करून आयोजित करण्यात आलेल्या ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन स्पर्धेच्या नियोजनातील त्रुटी यंदाही समोर आल्या. स्पर्धकांची घटती संख्या, प्रमाणपत्रे आणि पदकांच्या वाटपातील गलथान कारभार, प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीसाठी स्पर्धा उशिरा सुरू होणे, तसेच पाणी आणि अल्पोपहाराच्या उपलब्धतेतील दिरंगाईमुळे अनेक स्पर्धकांनी नाराजी व्यक्त केली. काही स्पर्धकांनी पुढील वर्षीपासून या स्पर्धेवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे महापालिकेच्या आयोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

ठाणे महापालिका आणि ठाणे जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने रविवारी ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. शिवसेनेचे दिवंगत खासदार सतीश प्रधान यांनी ही स्पर्धा सुरू केली होती. यंदा मॅरेथॉनचे ३२ वे वर्ष होते. रविवारी पहाटेपासूनच धावपटू आणि स्पर्धक महापालिका मुख्यालयाजवळील चौकात जमण्यास सुरुवात झाली होती. यंदाच्या स्पर्धेत ३० हजार स्पर्धकांनी सहभाग घेतल्याचे महापालिकेने जाहीर केले होते. मात्र, प्रत्यक्षात सहभागी स्पर्धकांची संख्या कमी दिसत होती.

दरवर्षीप्रमाणे यंदाही गर्दी वाढविण्यासाठी ठाणे महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात आले होते. सकाळी ६ वाजता २१ किलोमीटर गटातील स्पर्धा सुरू होणे अपेक्षित होते. मात्र, प्रमुख पाहुण्यांची उपस्थिती उशिराने झाल्याने ही स्पर्धा सुमारे २० मिनिटे उशिराने सुरू झाली. त्याचा परिणाम इतर गटांतील स्पर्धकांनाही सहन करावा लागला. स्पर्धकांकडून या बाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. तसेच, २१ किलोमीटरच्या मार्गिकेवर मार्गदर्शन करणारे फलकही अपुरे असल्याची तक्रार स्पर्धकांनी केली.

२१ किलोमीटरची स्पर्धा पूर्ण केल्यानंतर आलेल्या अनेक स्पर्धकांना पदके उपलब्ध होऊ शकली नाहीत. त्याचबरोबर तीन किलोमीटरच्या स्पर्धेसाठी शालेय विद्यार्थ्यांनाही सहभागी करून घेण्यात आले होते. ज्या ठिकाणी २१ किलोमीटरची स्पर्धा पूर्ण होत होती, त्याच ठिकाणी तीन किलोमीटर स्पर्धेतील विद्यार्थ्यांचीही सीमा रेषा निश्चित करण्यात आली होती.

सुरुवातीला केवळ २१ किलोमीटरच्या स्पर्धकांसाठी पदकांची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र, तीन किलोमीटरच्या स्पर्धेत सहभागी झालेल्या काही शालेय विद्यार्थ्यांनाही पदके देण्यात आली. त्यामुळे पदक वाटपात गोंधळ झाला. पदके न मिळाल्याने काही विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी मुख्य व्यासपीठासमोरच घोषणाबाजी केली. अखेर महापौर शर्मिला पिंपळोळकर यांच्यासह नगरसेवकांनी त्यांची समजूत काढली. त्यानंतर काही विद्यार्थ्यांनी महापालिका मुख्यालयातही घोषणाबाजी केली.

क्रीडा विभागाच्या उपायुक्त मीनल पालांडे यांनी स्पर्धा पूर्ण केलेल्या धावपटूंना महापालिकेच्या स्व. नरेंद्र बल्लाळ सभागृहात पदकांचे वाटप केले. तसेच, विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी झाल्याबद्दल प्रशस्तिपत्र दिले जाते. विद्यार्थ्यांना पदक देण्याची तरतूद यापूर्वीही नव्हती. त्यामुळे गैरसमजुतीतून हा प्रकार घडल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले.

मॅरेथॉनमध्ये मोठ्या उत्साहाने सहभागी झालेल्या लहान मुलांनी आपले कौशल्य दाखवत स्पर्धा पूर्ण केली. मात्र, नियोजनशून्य कारभारामुळे या चिमुरड्यांना त्यांचे हक्काचे पदकही मिळाले नाही. स्वतःच्या हक्कासाठी या लहान मुलांना भर रस्त्यात ठिय्या आंदोलन करावे लागणे ही ठाण्याच्या संस्कृतीला आणि क्रीडा क्षेत्राला काळिमा फासणारी बाब आहे. केदार दिघे, ठाणे जिल्हाप्रमुख, शिवसेना (ठाकरे गट)

मॅरेथॉन स्पर्धा 'झेन अल्फा'ने गाजवली. या स्पर्धेचे शहरात फलक खूप होते; मात्र पदक नव्हते, अशी टीका मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी केली.

– २१ किलोमीटरच्या स्पर्धकांना पदके देण्यास विलंब झाला, हे सत्य आहे. मात्र, त्यानंतर स्व. नरेंद्र बल्लाळ सभागृहात पदकांचे वाटप पूर्ण करण्यात आले. तसेच, स्पर्धकांची आम्ही दिलगिरी व्यक्त केली.

## मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनानिमित्त पालिका शाळांमध्ये "राष्ट्रीय क्रीडा दिन" साजरा

ठाणे : केंद्र शासनाच्या तसेच राज्य शासनाच्या निर्देशानुसार मा शिक्षण संचालक तसेच मा शिक्षण अधिकारी जिल्हा परिषद ठाणे यांचे सुचनेनुसार महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिका शाळांमध्ये तसेच सर्व व्यवस्थापनाच्या खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये 'राष्ट्रीय क्रीडा दिन' (NSD) काल अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

यावर्षी भारत सरकारच्या युवक कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या 'फिट इंडिया चळवळी अंतर्गत "खेलेगा भारत, जीतेगा भारत" या संकल्पनेखाली (Theme) दिनांक २८ ते ३० ऑगस्ट २०२६ या कालावधीत तीन दिवसीय देशव्यापी अभियान



आयोजित करण्यात आले आहे. भारतीय खेळ प्राधिकरणाच्या (SAI) मार्गदर्शक सूचनांनुसार (SOP), सदर तीन दिवसीय अभियानांतर्गत कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा आणि महाविद्यालयांमध्ये खालीलप्रमाणे दिनांक 28 ते 30 या कालावधीत विविध क्रीडा विषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे

१. दिनांक २८ ऑगस्ट २०२६ (शुक्रवार)- आदर व लोकसहभाग (Tribute):सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून,'फिट इंडिया तंदुरुस्ती प्रतिज्ञा देण्यात आली.

2. विद्यार्थ्यांसाठी शालेय स्तरावर "२९ चॅलेंज" (२९ Challenge), 'पास द बॉल' आणि 'स्पोर्ट्स बंधन यांसारख्या क्रीडा आव्हानांचे आयोजन करणे,राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या संकल्पनेवर आधारित निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि पोस्टर मेकिंग स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले.

२. दिनांक २९ ऑगस्ट २०२६ (शनिवार) - खेळ (Play) - मुख्य क्रीडा दिवस "एक घंटा खेल के मैदान में" (Ek Ghanta Khel Ke Maldan Meln): या गुख्य दिवशी राज्यातील सर्व शाळा व महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अनिवार्यपणे मैदानावर उतरून किमान एक तास आवडीचे खेळ खेळणे बंधनकारक करण्यात आलेले होते त्यानुसार सर्व शाळांमध्ये विविध खेळांचे आयोजन करण्यात आले .

3. शाळांमध्ये 'वर्ग विरुद्ध वर्ग किंवा 'शिक्षक विरुद्ध विद्यार्थी असे व्हॉलीबॉल, खो-खो, कबड्डी, लगोरी आणि लेझिम यांसारख्या पारंपरिक व देशी खेळांचे मैत्रीपूर्ण सामने आयोजित करणे. या दिवशी सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी अनिवार्यपणे क्रीडा पोशाख (Sports Attire) परिधान केलेला होता.

3. दिनांक ३० ऑगस्ट २०२६ (रविवार) गतिशीलता (Move):स्थानिक स्तरावर विद्यार्थी, एनसीसी (NCC) आणि एनएसएस (NSS) स्वयंसेवकांच्या मदतीने 'संडेज् ऑन सायकल' (Sundays on Cycle) अंतर्गत सायकल रॅली, प्रभात फेऱ्या किंवा वॉकथॉनचे आयोजन करणेबाबत महाविद्यालय शाळा स्तरांवर नियोजन करण्यात आलेले आहे.

वरील प्रमाणे तीन दिवस विविध क्रीडा विषयक उपक्रम आयोजित करून राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला आहे.

# वागळे पोलीस ठाण्यात पोलीस बांधवांना महिला कार्यकर्त्यांकडून रक्षाबंधन

■ शिवसेना पदाधिकारी दिपाली कराळे देसले यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम उत्साहात संपन्न

ठाणे : रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त ज्ञानेश्वर नगर, गंगाधर नगर परिसरातील शिवसेना महिला कार्यकर्त्यांनी वागळे पोलीस ठाण्यात जाऊन पोलीस बांधवांसोबत रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना पदाधिकारी . दिपाली कराळे देसले यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर कार्यक्रम पार पडला.

यावेळी महिला कार्यकर्त्यांनी पोलीस बांधवांच्या मनगटावर राखी बांधून रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या.

समाजाच्या सुरक्षिततेसाठी दिवस-रात्र कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस बांधवांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा उपक्रम भावनिक वातावरणात पार पडला. पोलीस कर्मचारी हे समाजाच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असतात, त्यामुळे त्यांच्यासोबत रक्षाबंधन साजरे करून महिला कार्यकर्त्यांनी बहीण-भावाच्या नात्याची आपुलकी जपली.

या कार्यक्रमास वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अशोक उतेकर, पोलीस उपनिरीक्षक जाधव, पोलीस उपनिरीक्षक राठोड, पोलीस हवालदार जगताप, पोलीस हवालदार ठाणगे, पोलीस हवालदार सत्यजित जाधव, सपोनिरी ढाकणे, पोलीस हवालदार राणे, पोलीस हवालदार भांबरे, पोलीस हवालदार जाधव आणि पोलीस हवालदार नजन यांच्यासह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.





यावेळी रुपाली नितीन खरात, श्रद्धा राकेश सालेकर, समिक्षा संजय शिंदे, रुपाली रामदास पाटील, राधिका रामदास पाटील, प्रमिला युवराज कदम, अश्मी विचारे, मधुरा राणे, मेघा मोरे, साक्षी संदीप पाठारे, आर्या दिनेश चोंदे, मंगल पाटील, आरती मालक आणि वनिता दुधे या महिला कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. रक्षाबंधनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून पोलीस बांधव आणि नागरिक यांच्यातील जिव्हाळ्याचे व विश्वासाचे नाते अधिक दृढ होण्यास मदत झाली. सामाजिक बांधिलकी जपत महिला कार्यकर्त्यांनी राबविलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.




अखिल महाराष्ट्र देशमुख मराठा समाजाच्या वतीने येऊर येथे वृक्षारोपण करण्यात आले. संस्थेचे माजी अध्यक्ष शिवाजीराव देशमुख यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित केलेल्या या वृक्षारोपण कार्यक्रमात येऊर परिसरात मोकळ्या जागेत वड, पिंपळ, औदुंबर, नारळ, कडुलिंब अशी भरपूर ऑक्सिजन देणारी झाडे लावण्यात आली. यावेळी देशमुख मराठा समाजाचे अध्यक्ष सुधाकर पतंगराव, समाजाच्या वधुवर विभागाचे प्रमुख नंदकुमार देशमुख, सचिव विजय खंडागळे, खजिनदार रोहिदास शिंदे,अशोक देशमुख, भालचंद्र चौधरी, चारुलता चौधरी उपस्थित होते.

## ठाण्यात 'मन की बात'मधून नशामुक्त भारत अभियान

■ राज्यातून आमदार संजय केळकर यांना आयोजनाचा मान

ठाणे : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' या उपक्रमातून आज नशामुक्त भारत अभियानाचे आवाहन केले. राज्यात ठाणे शहर मतदारसंघात आमदार संजय केळकर यांना उपक्रमाच्या आयोजनाचा मान देण्यात आला. ब्राह्मण सभा हॉल येथे आयोजित या उपक्रमास शहरातील विविध स्तरातील घटकांचा मोठ्या संख्येने सहभाग पाहायला मिळाला.



ठाणे शहरात आमदार संजय केळकर हे नशामुक्त ठाणे शहर ही चळवळ नागरिकांच्या सहभागातून राबवत आहेत. या कार्याला अधोरेखित करणारा सन्मान केळकर यांना प्राप्त झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' या उपक्रमातून नशामुक्त भारत अभियानाचे आवाहन केले. याचे आयोजन करण्याचा मान ठाणे शहर विधानसभा मतदारसंघात आमदार संजय केळकर यांना मिळाला. ठाणे स्टेशन रोडवरील ब्राह्मण सभा हॉल येथे रविवार ३० ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता केळकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा १३७व्या 'मन की बात' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी कोकण पदवीधर मतदार संघांचे आमदार निरंजन डावखरे, आमदार अमित गोरखे, नगरसेविका उषा वाघ, नम्रता कोळी, प्रतिभा मढवी, मृणाल पेंडसे, सुनेश जोशी, अमित सरय्या, मंडल अध्यक्ष रोहित गोसावी, विशाल वाघ, नितीन ढमाले यांच्यासह घरेलू कामगार, कोळी समाज, मुस्लिम समाज, व्यापारी वर्ग, मागासवर्गीय समाज अशा विविध घटकांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माध्यमांशी बोलताना केळकर म्हणाले, मन की बात या उपक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नशामुक्त भारताचे आवाहन केले, याची गरज प्रत्येक कुटुंबाला, समाजाला आणि देशाला सुद्धा आहे. ज्याप्रमाणे पंतप्रधान मोदी यांनी स्वच्छता अभियान सुरू केले आणि त्याचे रूपांतर चळवळीत झाले आणि त्याला मोठे यश मिळाले तसेच नशामुक्त भारत अभियान राबवू, असा संकल्प आपण सारे करू. घराघरात, मनामनात हे अभियान पोहोचले पाहिजे. सुदृढ मन, शरीर आणि बुध्दी स्वतःच्या, समाजाच्या, शहराच्या आणि देशाच्या विकासासाठी आवश्यक असल्याने आपण सारे ही चळवळ जनतेच्या सहभागातून पूढे नेऊ, असे आवाहन केळकर यांनी केले.

# मंगळागौर स्पर्धेतून संस्कृतीचा सोहळा व नारीशक्तीचा जागर : महापौर पाटील

नवी मुंबई : एकटी व्यक्ती आनंदी होऊ शकते मात्र एकजुटीने आनंदासोबतच परिवर्तन घडू शकते असे सांगत नवी मुंबईच्या महापौर श्रीम.सुजाता पाटील यांनी मंगळागौर स्पर्धा हे एकत्र येण्याचे माध्यम असल्याचे मत व्यक्त केले. मंगळागौर हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा सोहळा आहे, या माध्यमातून नारीशक्तीचा जागर होतो असे सांगत या स्पर्धेत सहभागी होणा-या महिला या संस्कृती जोपसाणा-या दूत आहेत अशा शब्दात महापौर महोदयांनी गौरव केला. नवी मुंबई महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीच्या वतीने वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे आयोजित महिला मेळाव्यानिमित्त त्या आपले मनोगत व्यक्त करीत होत्या.












नवी मुंबई : एकटी व्यक्ती आनंदी होऊ शकते मात्र एकजुटीने आनंदासोबतच परिवर्तन घडू शकते असे सांगत नवी मुंबईच्या महापौर श्रीम.सुजाता पाटील यांनी मंगळागौर स्पर्धा हे एकत्र येण्याचे माध्यम असल्याचे मत व्यक्त केले. मंगळागौर हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा सोहळा आहे, या माध्यमातून नारीशक्तीचा जागर होतो असे सांगत या स्पर्धेत सहभागी होणा-या महिला या संस्कृती जोपसाणा-या दूत आहेत अशा शब्दात महापौर महोदयांनी गौरव केला. नवी मुंबई महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीच्या वतीने वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे आयोजित महिला मेळाव्यानिमित्त त्या आपले मनोगत व्यक्त करीत होत्या.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना व उपक्रम राबवित नवी मुंबई महानगरपालिका कटिबध्द असल्याचे सांगून महापौर महोदयांनी आता एनएमएमटी बसेसमध्ये चालकही महिलाच असतील असे सांगितले. त्यादृष्टीने महिलांना चार चाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देणारी योजना महासभेत मंजूर केली असल्याचे सांगून मा.मुख्यमंत्री महोदयांच्या संकल्पनेतील एकल महिलांसाठीच्या योजनांकरिताही नोंदणी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी महापौर श्रीम.सुजाता पाटील यांचेसमवेत बेलापूर विधानसभा सदस्य आमदार श्रीम. मंदाताई म्हात्रे, सभागृह नेते श्री.सागर नाईक, महिला व बालकल्याण समिती सभापती श्रीम.सलुजा सुतार, फ प्रभाग समिती सभापती श्रीम. ललिता मढवी, आरोग्य समिती सभापती डॉ.जयाजी नाथ, नगरसेवक श्री. जयवंत सुतार, नगरसेविका श्रीम.अंजनी भोईर, श्रीम. स्वाती गुरखे, श्रीम.शशिकला पाटील, श्रीम.दयावती शेवाळे, ॲड. भारती पाटील, श्रीम. मिरा पाटील, श्रीम. संतोषी म्हात्रे, श्रीम. अंजना म्हात्रे, श्रीम.प्रिती भगत, श्रीम.शिल्पा ठाकूर, श्रीम. श्रेया जिरगे, श्रीम.मिनाक्षी पाटील, श्रीम.वैष्णवी नाईक, श्रीम. माधुरी सुतार, श्रीम. अंजली वाळुंज, श्रीम. प्रतिक्षा पाटील, श्रीम. रेश्मा मढवी, माजी नगरसेविका श्रीम. उषा भोईर, श्रीम. शिल्पा कांबळी, श्रीम. संगीता म्हात्रे, श्रीम.मोनिका पाटील, समाजविकास विभागाचे उपआयुक्त श्री. प्रकाश कांबळे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

बेलापूर विधानसभा सदस्य आ.श्रीम.मंदाताई म्हात्रे यांनी मंगळागौर स्पर्धेच्या माध्यमातून आपल्या संस्कृतीचे जतन होते असे सांगत सर्वांच्या एकत्र येण्याने हा कार्यक्रम आनंदोत्सव झाला असे मत व्यक्त केले. महिलांसाठी महानगरपालिका करीत असलेल्या योजनांची लवकरात लवकर प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी असेही त्यांनी सांगितले.

सभागृह नेते श्री.सागर नाईक यांनी नवी मुंबई हे परस्पर प्रेमभाव जपणारे कुटुंब असल्याचे सांगत येथील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी नवी मुंबई महानगरपालिका कटिबध्द असल्याचे मत मांडले. मुख्यमंत्री महोदयांच्या संकल्पनेतील लखपती दिदी योजना यशस्वीपणे राबविण्याकडे विशेष लक्ष देण्यात येत असल्याचे सांगत मंगळागौर स्पर्धेच्या माध्यमातून परंपरेचा संस्कार जपत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

महिला व बालकल्याण समितीच्या सभापती श्रीम. सलुजा सुतार यांनी प्रास्ताविकपर मनोगतात महिला व बालकल्याण समितीमार्फत विविध 20 प्रकारच्या योजना आणि उपक्रम राबविले जात असल्याची माहिती देत महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तुंसाठी विक्री केंद्र उपलब्ध करून देण्यासाठी ठोस प्रयत्न केले जात असल्याचे सांगितले. यादृष्टीने दिवाळीच्या आधी बचतगटांनी उत्पादित केलेल्या साहित्य विक्रीसाठी महोत्सव आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी जीवन आधार फाऊंडेशनच्या संस्थापक ॲड.रेखा चिरनेरकर यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात महिलांनी आपल्यातील कौशल्ये ओळखून त्याचे रूपांतर रोजगारामध्ये कसे होईल याकडे लक्ष द्यायला हवे असे सांगत उत्पादित वस्तूंच्या विक्रीसाठी एकत्र यावे तसेच समाज माध्यमांचा जास्तीत जास्त वापर करावा असे आवाहन केले.

# विश्वविक्रमी तिरंगा रॅलीतील सहभागी सामाजिक संस्था आणि शाळांचा कृतज्ञता सन्मान

**डोंबिवली : १५ ऑगस्ट रोजी डोंबिवलीत साकारलेल्या ३५ हजार चौरस फुटांच्या विशाल तिरंग्यासह विश्वविक्रमी तिरंगा रॅलीच्या यशात मोलाचे योगदान देणाऱ्या १०० सामाजिक संस्था आणि ७१ शाळांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आज डोंबिवली येथे कृतज्ञता सोहळा पार पडला. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात सहभागी सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी तसेच शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि संबंधित मान्यवरांना प्रमाणपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले.**







१५ ऑगस्ट रोजी डोंबिवली येथे आयोजित करण्यात आलेल्या या ऐतिहासिक तिरंगा रॅलीत मुसळधार पावसाचीही तमा न बाळगता हजारो विद्यार्थी आणि नागरिक सहभागी झाले होते. ३५ हजार चौरस फुटांचा विशाल तिरंगा हातात घेऊन नागरिकांनी केलेले मार्गक्रमण आणि रॅलीला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे डोंबिवलीत राष्ट्रभक्तीचा अभूतपूर्व सोहळा साकारला. या उपक्रमाची World Records India, Asia Book of Records आणि India Book of Records या तीन विक्रम नोंद संस्थांकडून अधिकृत नोंद करण्यात आली.

या विश्वविक्रमी उपक्रमाच्या यशामागे डोंबिवलीतील १०० सामाजिक संस्था आणि ७१ शाळांचा सक्रिय सहभाग होता. विद्यार्थ्यांपासून शिक्षक, पालक, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि स्वयंसेवकांपर्यंत विविध घटकांनी एकत्र येत या रॅलीला मोठे बळ दिले. या सर्वांच्या योगदानाची दखल घेत आजच्या कृतज्ञता सोहळ्यात त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे म्हणाले की, १५ ऑगस्ट रोजी डोंबिवलीच्या रस्त्यांवर एक विशाल तिरंगा घेऊन हजारो नागरिक एकत्र आलेला क्षण हा अत्यंत अभिमानाचा होता. मुसळधार पाऊस सुरू असतानाही विद्यार्थी, शिक्षक,

### खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत प्रमाणपत्र प्रदान

पालक, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि नागरिकांनी दाखवलेला उत्साह अविस्मरणीय होता. या विश्वविक्रमी रॅलीचा विक्रम हा केवळ एका उपक्रमाचा विक्रम नसून डोंबिवलीकरांच्या राष्ट्रप्रेमाचा, सामाजिक एकतेचा आणि सामूहिक सहभागाचा गौरव आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रध्वजाबद्दलचा अभिमान आणि देशाप्रती असलेली जबाबदारी अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. हजारो विद्यार्थ्यांनी तिरंगा हातात घेऊन रॅलीत सहभाग घेतला, ही विशेष समाधानाची बाब आहे. नव्या पिढीने देशाच्या प्रगतीसाठी पुढे यावे आणि राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात आपले योगदान द्यावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

१०० सामाजिक संस्था आणि ७१ शाळांनी एकत्र येत दिलेले योगदान हे डोंबिवलीच्या सामाजिक एकतेचे उत्तम उदाहरण आहे. विविध क्षेत्रांतील संस्था, विद्यार्थी आणि नागरिक एका तिरंग्याखाली एकत्र येऊ शकतात, याची ताकद या रॅलीच्या माध्यमातून दिसून आली. या सर्वांच्या योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आजचा सोहळा आयोजित करण्यात आला असून, सहभागी प्रत्येक संस्था, शाळा, विद्यार्थी, शिक्षक, पालक, स्वयंसेवक आणि नागरिकांचे मनःपूर्वक आभार असल्याचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सांगितले.

या कृतज्ञता सोहळ्यास सहभागी सामाजिक संस्थांचे मान्यवर अध्यक्ष, शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आमदार राजेश मोरे, जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, उपजिल्हाप्रमुख राजेश कदम यांच्यासह विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१